**रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी**
**Rambhau Mhalgi Prabodhini**

# संस्था बांधणी सहयोग योजना – ३ (IBSS - 3)

## ***अहवाल***

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचा ''**संस्था बांधणी सहयोग योजना**" हा प्रकल्प २००७-०८ साली सुरू झाला. समाजाच्या सर्व थरांमध्ये स्वयंसेवी कामाच्या माध्यमातून सेवाभावी वृत्तीने व संघ विचार घेऊन काम करणाऱ्या संस्था मोठ्या प्रमाणावर दिसत आहेत. या कामातील बदलत्या काळाच्या गरजा लक्षात घेऊन संस्थेच्या प्रशासकीय गरजा, प्रसिद्धी माध्यमांचा वापर व काम करत असलेले कार्यकर्ते - कर्मचारी यांचे प्रशिक्षण या तीन पैलुंवर प्रामुख्याने भर देत स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना मदत करणे हा संस्था बांधणी सहयोग योजना या प्रकल्पाचा उद्देश आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील ५ संस्थांसाठी ही योजना राबवली गेली. या योजनेची आवश्यकता व यशस्विता लक्षात घेऊन प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात (२००९-१०) महाराष्ट्रातील १० संस्थांची निवड करण्यात आली.

प्रकल्पाचा तिसरा टप्पा (२०११-२०१२) ऑगस्ट, २०११ पासून सुरु झाला. महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज मागविण्याची जाहिरात दि. २७ ऑगस्ट, २०११ रोजी तरुण भारत – देवगिरी आणि औरंगाबाद या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली. त्याचबरोबर साप्ताहिक विवेकमध्ये देखील दि. २८ ऑगस्ट, २०११ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली.



जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून ४७ स्वयंसेवी संस्थांनी अर्ज पाठवले. १७ जिल्ह्यातून अर्ज आले. आलेल्या अर्जांमधून ३५ संस्थांना मुलाखतीसाठी निवडण्यात आले. मुलाखती मुंबई आणि पुणे कार्यालयात दोन भागात करण्याचे ठरले. दि. ११ व १२ ऑक्टोबर, २०११ रोजी प्रबोधिनीच्या मुंबई येथील कार्यालयात निवडलेल्या संस्थांपैकी २४ संस्थांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यातील १२ संस्थांची योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी निवड झाली. दि. २ नोव्हेंबर, २०११ रोजी प्रबोधिनीच्या पुणे येथील कार्यालयात उर्वरित ११ संस्थांच्या मुलाखती झाल्या आणि त्यातून तीन संस्थांची योजनेमध्ये निवड करण्यात आली.

**निवड समिती सदस्य** : प्रमोद कुलकर्णी, विवेक अत्रे, श्रीराम पटवर्धन, विनोद पवार, विनय सहस्रबुद्धे, रवींद्र साठे, डॉ. प्रसाद देवधर, जयेश जोशी, ज्योती चौथाईवाले आणि डॉ. अरुणा कौलगुड

***निवड झालेल्या संस्थांची नावे :***

| अ.क्र. | संस्थेचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १. | अ. श्री. ओक वनौषधी संशोधन व संवर्धन प्रतिष्ठान | कर्जत, रायगड |
| २. | नाना पालकर स्मृती समिती | मुंबई |
| ३. | जनभारती न्यास | कोल्हापूर |
| ४. | विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान | सांगली |
| ५. | गोविंद महाराज समाज विकास परिषद | निलंगा, लातूर |
| ६. | भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान | यमगरवाडी, उस्मानाबाद |
| ७. | ग्राम विकास मंडळ | काकोडा, जळगाव |
| ८. | वनवासी उत्कर्ष समिती | नवापूर, नंदूरबार |
| ९. | संपूर्ण बांबू केंद्र | लवादा, अमरावती |
| १०. | डॉ. हेडगेवार सेवा समिती | चंद्रपूर |
| ११. | डॉ. आंबेडकर वनवासी कल्याण ट्रस्ट | सूरत, गुजरात |
| १२. | सेवा भारती (मध्य भारत) | भोपाळ, मध्यप्रदेश |
| १३. | श्री सेवा भारती शिक्षा समिती | इंदोर, मध्यप्रदेश |
| १४. | राष्ट्रोत्थान न्यास | ग्वाल्हेर, मध्यप्रदेश |
| १५. | छत्तीसगड महिला मंच | रायपूर, छत्तीसगड |

संस्था बांधणी सहयोग योजना – ३ अंतर्गत निवड झालेल्या संस्थांच्या विश्वस्तांचे आणि पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण दि. २७ व २८ डिसेंबर, २०११ रोजी प्रबोधिनीच्या ज्ञान नैपुण्य केंद्रात आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी १५ संस्थांमधुन एकूण ५० सहभागींची नोंदणी झाली होती. उपस्थितांमध्ये संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, यांचा समावेश होता.

**सहभागींच्या संख्येबाबतचा तपशील :**

| राज्ये | जिल्हे | महिला | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|---|
| ४ | १५ | ७ | ४३ | ५० |

प्रशिक्षणाचे उद्‌घाटन प्रबोधिनीचे व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. अरविंद रेगे आणि महासंचालक डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते झाले.





श्री.अरविंद रेगे आणि डॉ. विनय सहस्त्रबुद्धे उद्‌घाटन करतांना

जानेवारी, २०१२ महिन्यात सर्व निवड झालेल्या संस्थांची पाहणी करण्यात आली. तीन ते चार तज्ञ व्यक्तींच्या समूहाने प्रत्येक संस्थेची पाहणी केली. या पाहणी पथकातील तज्ञांची नावे खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | तज्ञांची नावे | क्षेत्र |
|---|---|---|
| १. | सुनिल मिश्रा | वेबसाईट |
| २. | अतुल धारप | आर्थिक |
| ३. | विनोद पवार | प्रचार-प्रसिद्धी |
| ४. | अरविंद रेगे | व्यवस्थापन |
| ५. | चंद्रशेखर वझे | आर्थिक |
| ६. | डॉ. अरुणा कौलगुड | व्यवस्थापन |
| ७. | शशांक टिळक | तंत्रज्ञान |
| ८. | दिलीप नवेले | प्रबोधिनी प्रतिनिधी |
| ९. | डॉ. प्रफुल्ल जोशी | सामाजिक |
| १०. | श्रीराम पटवर्धन | आर्थिक |
| ११. | मिलिंद बेटावदकर | प्रबोधिनी प्रतिनिधी |
| १२. | राजेंद्र नन्नावरे | सामाजिक |
| १३. | तेजस पाध्ये | आर्थिक |
| १४. | उमेश मोरे | प्रबोधिनी प्रतिनिधी |
| १५. | जयेश जोशी | प्रचार-प्रसिद्धी, वेबसाईट |
| १६. | मृदुल बापट | प्रबोधिनी प्रतिनिधी |

| | | |
|---|---|---|
| १७. | प्रमोद कुलकर्णी | सामाजिक |
| १८. | डॉ. प्रसाद देवधर | सामाजिक |
| १९. | शिरीष भगत | आर्थिक |
| २०. | डॉ. गजानन डांगे | सामाजिक |
| २१. | ज्योती चौथाईवाले | सामाजिक |
| २२. | सुनील जंगम | प्रबोधिनी प्रतिनिधी |
| २३. | विवेक अत्रे | सामाजिक |
| २४. | रवींद्र साठे | सामाजिक |
| २५. | गिरीश जोशी | सामाजिक |
| २६. | रवी गुप्ता | सामाजिक |

प्रत्येक संस्थेचा पाहणीपथकाने एक अहवाल तयार केला. त्यानुसार संस्थेमधील कमतरतांचा अभ्यास करण्यात आला.

दि. १० मार्च, २०१२ रोजी योजनेसाठीची एक चिंतन बैठक उत्तन येथील प्रशिक्षण संकुलात घेण्यात आली. या बैठकीत प्रत्येक संस्थेसाठी पालक नेमण्यात आले.

१. ओक वनौषधी संशोधन आणि संवर्धन प्रतिष्ठान, कर्जत : निरंजन वेलणकर
२. नाना पालकर स्मृती समिती, मुंबई : अरविंद रेगे
३. जन भारती न्यास, कोल्हापूर : डॉ. अरुणा कौलगुड
४. विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान, सांगली : डॉ. अरुणा कौलगुड
५. गोविंद महाराज गोपाळ समाज विकास परिषद, लातूर : मिलिंद बेटावदकर
६. भटके विमुक्त विकास परिषद, उस्मानाबाद : मिलिंद बेटावदकर
७. ग्राम विकास मंडळ, काकोडा, जळगाव : प्रमोद कुलकर्णी
८. वनवासी उत्कर्ष समिती, नवापूर, नंदूरबार : उमेश मोरे
९. संपूर्ण बांबू केंद्र, अमरावती : प्रमोद कुलकर्णी
१०. डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समिती, चंद्रपूर : प्रमोद कुलकर्णी
११. डॉ. आंबेडकर वनवासी कल्याण ट्रस्ट, सूरत : ज्योती चौथाईवाले
१२. सेवा भारती (मध्य भारत), भोपाल : विवेक अत्रे
१३. श्री सेवा भारती शिक्षा समिती, इंदोर : अरविंद रेगे
१४. राष्ट्रोत्थान न्यास, ग्वाल्हेर : विवेक अत्रे
१५. छत्तीसगड महिला मंच, रायपूर : रवींद्र साठे

दुस-या टप्प्यात संस्थेच्या प्रशासकीय / कार्यालयीन कामात लक्ष देण्यासाठी प्रत्येक संस्थेसाठी कार्यालयीन समन्वयकांची नियुक्ती करण्यासाठी दि. २८ फेब्रुवारी, २०१२ रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील सकाळ या वृत्तपत्रातून कार्यालय समन्वयक पदासाठी अर्ज पाठवण्याची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. या जाहिरातीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण २३३ अर्ज आले. त्यातून निवडलेल्या संस्थेच्या जिल्ह्यानुसार योग्य अर्जांची निवड करण्यात आली. १४३ अर्जदारांची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली. प्रत्येक निवडलेल्या संस्थेच्या ठिकाणीच कार्यालयीन समन्वयक पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या. त्यातून प्रत्येक संस्थेसाठी एक अशा दहा योग्य अर्जदारांची अंतिम निवड करण्यात आली. महाराष्ट्राबाहेरील निवडलेल्या संस्थांनी आपापल्या ठिकाणी अर्ज मागवले होते व तेथेही प्रत्येकी एका समन्वयकाची अंतिम निवड आली.

या समन्वयकांचे प्रशिक्षण प्रबोधिनीच्या प्रशिक्षण संकुलात दि. १५ ते १७ मे, २०१२ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणात एकूण ११ समन्वयकांनी सहभाग घेतला.

| राज्ये | जिल्हे | महिला | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|---|
| ४ | ७ (महाराष्ट्र)<br>२ (इतर राज्ये) | ४ | ७ | ११ |

**अंतिम निवड झालेल्या समन्वयकांची नावे** :

| अ.क्र. | संस्थेचे नाव | ठिकाण | समन्वयकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | अ. श्री. ओक वनौषधी संशोधन व संवर्धन प्रतिष्ठान | कर्जत, रायगड | कविता गायकवाड |
| २. | नाना पालकर स्मृती समिती | मुंबई | वैशाली देशपांडे |
| ३. | जनभारती न्यास | कोल्हापूर | सुरेश पोवार |
| ४. | विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान | सांगली | प्रकाश पोळ |
| ५. | गोविंद महाराज समाज विकास परिषद | निलंगा, लातूर | चंद्रशेखर पाटील |
| ६. | भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान | यमगरवाडी, उस्मानाबाद | उमाकांत मिटकर |
| ७. | ग्राम विकास मंडळ | काकोडा, जळगाव | ज्ञानेश्वर ढोले |
| ८. | वनवासी उत्कर्ष समिती | नवापूर, नंदूरबार | राहुल मराठे |
| ९. | संपूर्ण बांबू केंद्र | लवादा, अमरावती | सुरुची नाईक |
| १०. | डॉ. हेडगेवार सेवा समिती | चंद्रपूर | वैभव थोटे |
| ११. | डॉ. आंबेडकर वनवासी कल्याण ट्रस्ट | सूरत, गुजरात | कृपा व्यास |
| १२. | सेवा भारती (मध्य भारत) | भोपाळ, मध्यप्रदेश | अनुराग पांडे |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | श्री सेवा भारती शिक्षा समिती | इंदोर, मध्यप्रदेश | सीमा खलसे |
| १४. | राष्ट्रोत्थान न्यास | ग्वाल्हेर, मध्यप्रदेश | जीतेंद्र वझे |
| १५. | छत्तीसगड महिला मंच | रायपूर, छत्तीसगड | म्यानसिंग साहू |

-

वरील काही समन्वयकांची नियुक्ती १ जून, २०१२ पासून त्या त्या संस्थेमध्ये करण्यात आली. तर काही समन्वयकांची नियुक्ती जुलै आणि ऑगस्ट महिन्यापासून करण्यात आली.
प्रत्येक निवडलेल्या संस्थेमधील विश्वस्तांचे आणि कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण दि. २० मे, २०१२ रोजी पुणे येथे तर दि. २७ मे, २०१२ रोजी इंदोर येथे घेण्यात आले. या प्रशिक्षणासाठी अनुक्रमे १६ आणि १० प्रशिक्षक उपस्थित होते.

सर्व समन्वयक आपापल्या संस्थांमध्ये रुजू झाल्यानंतर जुलै आणि ऑगस्ट, २०१२ या दोन महिन्यांत सर्व संस्थांच्या विश्वस्तांसाठी, कमचारी वर्गासाठी आणि कार्यकर्त्यांसाठी त्या त्या संस्थांच्या ठिकाणी प्रशिक्षण घेण्यात आले. चंद्रपूर येथील डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समिती या संस्थेचे प्रशिक्षण होऊ शकले नाही.

दि. ४ सप्टेंबर, २०१२ रोजी पालकांची चिंतन बैठक प्रबोधिनीच्या ज्ञान नैपुण्य केंद्रात घेण्यात आली. बैठकीत संस्थांच्या विश्वस्तांची एक बैठक दि. २७ व २८ ऑक्टोबर, २०१२ रोजी ज्ञान नैपुण्य केंद्रात घ्यावी असे ठरले. ही बैठक ठरल्याप्रमाणे संपन्न झाली. विश्वस्तांबरोबर त्या त्या संस्थेचे पालकही बैठकीस उपस्थित होते. या बैठकीत योजनेच्या पुढील टप्प्यांबाबत चर्चा करण्यात आली. विश्वस्त आणि कर्मचारी - कार्यकर्ते यांच्या दुस-या टप्प्यातील प्रशिक्षणाबाबत निश्चिती करण्यात आली. जानेवारी व फेब्रुवारी, २०१३ या दोन महिन्यात विश्वस्त आणि कर्मचारी, कार्यकर्ते यांसाठी प्रशिक्षणे त्या त्या संस्थांच्या ठिकाणी घेण्यात आली.

फेब्रुवारी आणि मार्च महिन्यामध्ये संस्थांच्या वेबसाईटच्या संदर्भात तज्ज्ञांनी काम करावे, असे ठरले. ज्या संस्थांच्या वेबसाईट पूर्वीपासून आहेत परंतु त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे, अशा संस्था आणि ज्या संस्थांसाठी वेबसाईट पूर्णपणे नव्याने निर्माण करण्याची आवश्यकता आहे, अशा संस्थांना वेबसाईट तज्ज्ञांनी भेट दिली आणि वेबसाईट निर्मितीच्या कामाला सुरुवात करण्यात आली.



शनिवार, दि. ३० मार्च, २०१३ रोजी संस्था बांधणी सहयोग योजना – ३ या पर्वाचा सांगता समारंभ पुणे येथील एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशनच्या सभागृहात सायं. ६.०० ते ८.४५ या वेळेत संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून रा.स्व.संघाचे सह सरकार्यवाह मा. श्री. दत्तात्रय होसबाळे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सकाळ वृत्तपत्र समूहाचे संपादक श्री. मल्हार अरणकल्ले यांना निमंत्रित करण्यात आले होते.

तसेच व्यासपीठावर प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. अरविंद रेगे, संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्राच्या मानद संचालिका डॉ. अरुणा कौलगुड, महासंचालक डॉ. विनय सहस्त्रबुद्धे आणि कार्यकारी संचालक श्री. रवींद्र साठे उपस्थित होते.

समारंभात योजनेतील १५ संस्थांपैकी १२ संस्था उपस्थित राहू शकल्या. यांतील चार संस्थांच्या प्रतिनिधींची प्रातिनिधीक मुलाखत मनस्विनी प्रभुणे यांनी घेतली. त्या संस्था अशा :



**१. वनवासी उत्कर्ष समिती, नवापूर, नंदूरबार - मुकुंद निकम**
२. विवेकानंद वैद्यक **प्रतिष्ठान, सांगली**. - डॉ. राम **लाडे**
**३. संपूर्ण बांबू केंद्र, धारणी, अमरावती. – धनंजय भिडे**
४. **श्री सेवा भारती शिक्षा** समिती, इंदोर. - विनोद **बिडला**

योजनेत सहभाग घेतल्याचे प्रमाणपत्रदेखील या संस्थांना प्रमुख पाहुणे आणि अध्यक्षांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रमुख पाहुणे रा.स्व.संघाचे सह सरकार्यवाह मा. श्री. दत्तात्रय होसबाळे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष सकाळ वृत्तपत्र समूहाचे संपादक श्री. मल्हार अरणकल्ले यांच्या भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला.



********